कनिष्ठ पद/संवर्ग/सेवामधून वरिष्ठ पद/
संवर्ग/सेवामधील पदोन्नती करतांना
पाळावयाची तत्वे - गोपनीय अहवाल.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-१०८९/३६५४/[प्र.क्र. १२/८९]/बारा,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २८ मार्च, १९९०.

वाचा:- १] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०७४/
डी, दिनांक २८ जानेवारी, १९७५.

शासन निर्णय :- विभिन्न पदांवरील पदोन्नत्यांसाठी कर्मचा-यांची निवड करणा-या पदोन्नती समित्या/मंडळे यांनी विचार क्षेत्रातील कर्मचा-यांची पदोन्नतीसाठीची योगा-योग्यता तपासतांना किती वर्षाचे गोपनीय अहवाल विचारात घ्यावेत याबाबत आतापर्यन्त निश्चित स्वरूपाचे असे सर्वसाधारण आदेश नाहीत. त्यामुळे काही समित्या पाच वर्षाचे गोपनीय अहवाल विचारात घेतात तर काही समित्या फक्त तीन वर्षाचे गोपनीय अहवाल विचारात घेतात. तथापि अशा कार्यवाहीकरीता निश्चित स्वरूपाचे आदेश असावेत व

[कृ. मा. प.]

र्यपध्दतीत सुसूत्रता यावी म्हणून शासनाचे आता असे आदेश आहेत की, यापुढे विभिन्न पदावरील पदोन्नत्यांसाठी विचार क्षेत्रातील कर्मचा-यांची/अधिका-यांची पदोन्नतीसाठीची योगायोग्यता तपासताना निवडसूची तयार करावयाच्या वेळी त्यांचे अलिकडचे पाच वर्षांचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भा. म. भणगे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
* प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
वेगवेगळया मंत्रालयीन विभागांच्या अखात्यारितील सर्व विभागीय व कार्यालयीन प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.

---

* पत्राने.